<u>प्रेस नोट ता. २९/०४/२०२३</u>  <u>पोलीस स्टेशन - वाकड</u>

**बस मध्ये चो-या करणारे महीलांना अटक, महीलांकडुन चोरीचे ०५ गुन्हे उघड करुन किं.रु.४,७१,०००/- चा मुद्देमाल जप्त.**

**वाकड पोलीस स्टेशन तपास पथकाची कामगिरी.**

--- ०० ---

पिंपरी चिंचवड परीसरात बस मध्ये होणा-या चो-यां मध्ये मोठया प्रमाणावर वाढ झालेने **मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त,पिंपरी चिंचवड,** यांनी सर्व पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांना बस मधील चो-या उघड करणेबाबत आदेश दिले होते.

त्या अनुषंगाने मा.श्री.सत्यवान माने,वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाकड पोलीस ठाणे यांनी त्यांचे अधिनस्थ असलेल्या तपास पथकाकील सपोनि संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण व तपास पथक अंमलदार यांची वेगवेगळी पथके तयार करून आरोपीना अटक करून गुन्हा उघड करणेबाबत सुचना दिल्या.

त्याप्रमाणे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी विश्वासु बातमीदारामार्फत बातमी काढणेचे काम सुरु केले. दरम्यान **पोना.१४९६ विक्रांत चव्हाण** यांना विश्वासु बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, काही संशयीत महीला डांगे चौकातील बिआरटी बस स्टॉप जवळ फिरत आहेत. अशी बातमी मिळालेने त्यांनी सदरची बातमी सपोनि.संतोष पाटील यांना सांगीतली.

सपोनि.संतोष पाटील यांनी लागलीच स्वतः तसेच पोउपनि.सचिन चव्हाण तसेच तपास पथकातील पोलीस अंमलदार व महीला पोलीस अंमलदार यांना घेवुन डांगे चौक येथे जावुन बिआरटी बस स्टॉप येथे थांबलेल्या ०४ महीलांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे चौकशी केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. सदरचे महीलांबाबत अधिक संशय बळावल्याने त्यांना पोलीस स्टेशन येथे आणुन त्यांना विश्वासात घेवुन नाव पत्ते विचारले असता त्यांनी आपली नावे :- **१) सोनिया अजय कांबळे, वय ३१ वर्षे, २) मिना मिलींद उपाध्ये, वय ३० वर्षे, ३) सुमन प्रताप काळे, वय २९ वर्षे, ४) लक्ष्मी बिलीमोर उपाध्ये, वय २१ वर्षे, सर्व रा. राजीव गांधी नगर झोपडपट्टी विश्रांतवाडी पुणे** असे सांगीतले.

महीला आरोंपीकडे कौशल्यपुर्वक तपास केला असता त्यांनी पिंपरी चिंचवड परीसरातील बसमधील चोरीचे ०५ गुन्हयांची कबुली दिली असुन महीला आरोपींकडुन एकुण **४,७०,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे, चांदीचे दागिणे व रोख रक्कम** असा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे.

**महीला आरोपींकडुन खालील गुन्हे उघड करणेत आले आहेत.**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नंबर | कलम |
|---|---|---|---|
| १ | वाकड | ३९३/२०२३ | भादवि कलम ३७९, ३४ |
| २ | वाकड | १२९/२०२३ | भादवि कलम ३७९ |
| ३ | वाकड | २४२/२०२३ | भादवि कलम ३७९ |
| ४ | वाकड | २७७/२०२१ | भादविक ३७९ |
| ५ | चिंचवड | १७३/२०२३ | भादवि कलम ३७९ |

सदरची कारवाई मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.श्री.डॉ.संजय शिंदे सो, सह.पोलीस आयुक्त मा.श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. श्री. डॉ.काकासाहेब डोळे सो, पोलीस उप आयुक्त,परि-२, पिंपरी चिंचवड, मा. श्री. श्रीकांत डिसले, सहा.पोलीस आयुक्त सो, वाकड विभाग, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली मा.श्री.सत्यवान माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मा.श्री. संतोष पाटील पोलीस निरीक्षक गुन्हे-१,

मा.श्री.रामचंद्र घाडगे पोलीस निरीक्षक गुन्हे-२, सपोनि. संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण, सपोफौ.बिभीषण कन्हेरकर, सपोफौ.बाबाजान इनामदार, सपोफौ.राजेंद्र काळे, पोहवा.वंदु गिरे, पोहवा संतोष बर्गे, पोहवा.संदीप गवारी, पोहवा.दिपक साबळे, पोहवा.स्वप्निल खेतले, पोहवा.अतिश जाधव, पोहवा.प्रमोद कदम,पोना.अतिक शेख, पोना.विक्रांत चव्हाण, पोना.राम तळपे, पोशि.अजय फल्ले, पोशि.तात्या शिंदे, पोशि.कौतेंय खराडे, पोशि.भास्कर भारती, पोशि.स्वप्निल लोखंडे, पोशि. सौदागर लामतुरे, पोशि.विनायक घारगे, पोशि रमेश खेडकर, यांनी मिळुन केली आहे.

**(डॉ.काकासाहेब डोळे)**
पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ-२, पिंपरी चिंचवड